# बृहन्मुंबई महानगरपालिका

## लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय शीव मुंबई - २२

**क्र. लो. टी. रु. /478 / बा.रो.चि. वि.**

**दि. ०४/०९/२०२४**

**जाहिरात**

**लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयातील लो. टि. म. स. रूग्णालयाशी संलन्गित धारावी येथील रुग्णालयात लहान मुलांकरिता कुपोषण पुर्नवसन, संशोधन व प्रशिक्षण आरोग्य केंद्राकरीता (बालरोग चिकित्सा विभाग) आहारतज्ज्ञ  व समुपदेशक - ०१ पदे  दि. ३१/०३/२०२५ पर्यंत कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरून** http://www.mcgm.gov.in **सदर जाहिरातीसोबत जोडलेल्या आहारतज्ज्ञ  व समुपदेशक या पदाकरिता असलेलया अर्जाच्या नमुन्याची प्रत घेऊन लो. टि. म. स. रूग्णालय. कॉलेज इमारत, तळ मजला, रोखपाल विभाग (रु. न. १५) येथे रुपये ७१०/- + १८% जीएसटी  रु. १२८/- = एकूण रु. ८३८/- इतके शुक्ल दि. ०६/०९/२०२४ ते १९/०९/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सर्व शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी ११.०० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत भरून, त्याची मूळ पावती अर्जासोबत जोडून पुर्ण भरलेला अर्ज सोबत शैक्षणिक अर्जतेची सर्व कागदपत्रे जोडून  लो. टी. म. स. रूग्णालयाच्या  आवक /जावक विभागात दि. १९/०९/२०२४ रोजी पर्यंत सादर करावा.**

| अनु क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अहर्ता |
|---|---|---|---|---|
| १ | आहारतज्ज्ञ  व समुपदेशक | ०१ | रु. २५०००/- | एम. एस. सी. न्युट्रिशन आणि डायटेटिक्स किंवा पी. जी. डिप्लोमा न्युट्रिशन आणि डायटेटिक्स |

**खालील नमूद केलेल्या अहर्ता व अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.**

**वयाची अट: दि. १९/०९/२०२४ पर्यंत वय १८ वर्षांपेक्षा कमी व ३८ वर्षांपेक्षा अधिक नसावे आणि  मागासवर्गीयांकरीता** 43 **वर्षांपेक्षा अधिक नसावे.**

**सर्वसाधारण अटी –**

1. **उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे.  तसेच ते  नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात. उमेदवाराने अर्जावर पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा  व त्यावर त्याने उपलब्ध जागेत स्वाक्षरी करावी.**
2. **उमेदवाराने पदविका /पदवी परीक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास ती परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केली याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.**
3. **उमेदवाराला कोणत्याही न्यायालयात नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.**
4. **निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा  नियुक्तीनंतर  कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल.  तसेच  नियुक्ती झालेली  असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.**
5. **उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियुक्तीचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.**

6. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
7. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
8. निवड झालेल्या उमेदवारांस रुपये 500/- च्या बंधपत्रावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.
9. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून नेमणुकीनंतर एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.
10. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकांची नियुक्ती कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
11. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
12. कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 30 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.
13. कंत्राटी कर्मचा-यांना मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
14. उपरोक्त पदाची कंत्राट तत्वावर नियुक्ती 90 दिवसांपेक्षा जास्त नाही, अशा प्रकारे करण्यात येईल.
15. उमेदवारास महाविद्यालय व रुग्णालयाच्या नियुक्त केलेल्या ठिकाणी किंवा वेळोवेळी वरिष्ठांच्या आदेशानुसार कामकाजाच्या तीनही पाळ्यांमध्ये काम करावे लागेल.
16. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त कंत्राटी कर्मचा-यांना लागू असणा-या प्रचलित नियमानुसार नैमितिक रजा अनुज्ञेय असतील.
17. त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.
18. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीनुसार ही नेमणूक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निंवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.
19. ते दररोज त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार बायोमेट्रीक करतील व नियमाने हजेरी पटावर स्वाक्षरी करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी करण्यात येईल.

<u>विशेष सूचना –</u>

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) सविस्तर सूचना, याबाबतच्या अटी व शर्ती, मनपाच्या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आल्या आहेत. उमेदवारांनी त्याचे बारकाईने अवलोकन करुन संकेतस्थळावर प्रसारीत केलेल्या अर्जाच्या तसेच वैयक्तीक माहितीपत्राच्या नमुन्यामध्ये अर्ज करावा. अर्जाचे विहित शुल्क भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

क) टपालाने / कुरिअरने /ई-मेलद्वारे आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

ड) पात्र उमेदवारांच्या मुलाखती संबंधी ठिकाण, दिनांक व वेळ उमेदवारांच्या ई-मेल वर कळविण्यात येईल.

Sd/-4/9/24
**डॉ. राधा घिल्डीयाल**
**प्राध्यापक,व खातेप्रमुख**
**बालरोग चिकित्सा विभाग**

Sd/- 5/9/2024
**(डॉ. मोहन जोशी)**
**अधिष्ठाता**
**लो. टि. म. स. रूग्णालय, शीव**

बृहन्मुंबई महानगरपालिका
लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022
दूरध्वनी क्रं. - 02224066381-89/

## अर्जाचा नमुना

पदाचे नाव: ___________________

प्रति,
अधिष्ठाता,
लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व
सर्वसाधारण रूग्णालय, शीव,
मुंबई – 400022.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022 मध्ये ______________ पदाकरिता दिनांक _______________ च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज करत आहे. माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे :

1) (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :

______________________________________________________________________

2) पत्ता (कायमचा) :

______________________________________________________________________

______________________________________________________________________

3) पत्ता (पत्रव्यवहाराचा) :

______________________________________________________________________

4) पदाचे नाव _________________________

5) जन्म दिनांक: _______________________________

6) वजन: _________________ किलो उंची: ____________________ सें.मी.

7) वय:

8) शैक्षणिक अर्हता: _______________________________________________________

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

सोबत : प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रति

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक

# बृहन्मुंबई महानगरपालिका

लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022
दूरध्वनी क्रं. - 0224063081-89

## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

1) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) मराठीत:

___________________________________________________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव:

___________________________________________________________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता):

___________________________________________________________________

4) पत्ता ______________________________________________________________

___________________________________________________________________

5) दूरध्वनी क्रमांक : ______________________________________________________

6) इ – मेल आय डी : ________________________________________________

7) लिंग– पुरुष ________________स्त्री ___________________

8) जन्मदिनांक: दिनांक_________ महिना_________ वर्ष __________

दिनांक __________________ रोजी असलेले वय _________ महिने _______ दिवस_____

9) शैक्षणिक अर्हता:

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | उच्च माध्यमिक शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| दहावी | | | | | | | |
| बारावी | | | | | | | |
| पदवी (Degree) | | | | | | | |
| पदविका (Diploma) | | | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | | | |

10) अनुभव: ____________________________________________

11) स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता: ____________________________________

______________________________________________________________________

12) उंची: ___ फूट __ इंच, वजन: _____ कि.ग्रा., शरीराची ठेवण: किरकोळ / मध्यम / सुदृढ वर्ण: _________ नेत्र वर्ण: _________ वैयक्तिक खूण:____________

13) संगणकविषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे / नाही

14) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील: ______________________________________

______________________________________________________________________

15) उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयिन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. होय / नाही

16) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. होय / नाही

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक: